# वाटचाल...
# २००८ ते २००९

# 'प्रेमांकूर'
## सामाजिक संस्था, नाशिक

विश्वस्थ संस्था नोंदणी क्र.एफ / ७८२३ / ०३ / नाशिक




पत्ता ः ४, 'मॉ' कुंभपूजा रो हाऊस, के.जे.मेहता हायस्कूल मागे, सदगूरू नगर, नाशिकरोड नाशिक ४२२ १०२.
संपर्क केंद्र ः मू.पो. बा-हे सूरगाणा रोड ता. सूरगाणा जिल्हा ः नाशिक
दुरध्वनी क्र ः ०२५३–२४६४७१३ / ९८२२२५३५१८ ई मेल : premankur_nsk @ rediffmail.com

# प्रस्तावना...

प्रेमांकूर सामाजिक संस्थेची २००८ ते २००९ ची वाटचाल आपणासमोर मांडतांना आम्हाला आनंद होत आहे. संस्थेने हाती घेतलेले उपक्रम सुरळीतपणे चालूच आहेत. या उपक्रमाच्या निमिताने आम्ही २००० महिला १००० बालके १५०० युवकांपर्यंत पोहोचलो. त्यांच्या सहभागातूनच 'प्रेमांकूरचे' अस्तीत्व ख-या अर्थाने लोककेंद्री बनले. रोजगार व स्वंयरोजगाराचे नवनवीन व ग्राहकांच्या गरजेनूसार उपक्रम बाजारात आणले यातून अनेकांना रोजगार उपलब्ध झाला. बचत गटाच्या माध्यमातून एकत्रित आलेल्या महिलांचे खेळते भांडवल लाखाच्या घरात पोहचले. नूकताच सूरू केलेला खेळघर प्रकल्पाच्या माध्यमातून मूले संस्थेच्या जवळ आली व विवीध प्रश्न उपस्थित करू लागली.

'प्रेमांकूरने' बालमित्र, 'आकार' बाल व युवक वाचनालय, सखी स्वंयसिध्दा प्रकल्पा सारखे प्रकल्प सुरू केले असून त्यातूनच खेळघर, आदिवासी कला गुणांना वाव देणारे निसर्ग मित्र व वनऔषधी झाडांची नविन पिढिला ओळख, रोजगार व स्वंयरोजगाराचे गावातच नाविण्यपूर्ण व अर्थार्जन होणारे प्रकल्प नव्याने जन्म घेत आहे.

कधी कधी आपण केलेल्या कामाचा आढावा घेताना अभिमान वाटतो आणि त्या क्षणी जाणीव होते "अजून खूप काही वाटचाल शिल्लक आहे." भविष्यातील आमच्या वाटचालीत आपण असेच आमच्या पाठीशी उभे रहाल या विश्वासासह...

मंगेश सूर्यवंशी
अध्यक्ष
'प्रेमांकूर'

# ‘प्रेमांकूर’ विषयी...

समाज परिवर्तनाच्या प्रक्रीयेत ‘लोकसहभाग’ हे महत्वाचे मूल्य आधारभूत माणून ‘प्रेमांकूर’ नाशिक जिल्हयातील सूरगाणा व पेठ तालुक्यातील आदिवासी गावात कार्यरत आहे.गावातील शेतकरी, स्त्रिया, तरूण व बालके या मूख्य घटकांसोबत संस्थेचा हा सहप्रवास याच दिशेने सुरू आहे.यासाठी सखी प्रकल्पाव्दारे पंचायत सखी, बालमित्र, आकार वाचनालय, माध्यम साधन केंद्र ही काही प्राथमिक साधने. यातून गावातील पारंपारीक जतन व्हावे, उपजीविकेच्या साधनांची सक्षमता वाढावी. स्थानिक व शहरातील गरजा बघून रोजगार व स्वंयरोजगारांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात.बालकांच्या शिक्षणाच्या व विकासाच्या हक्कांची जपणूक व्हावी, परिसरातील जैव विविधतेबद्यल जागरूकता निर्माण व्हावी हाच यातील ध्यास......

याच बरोबरीने शहराची होणारी मोठी वाढ व गावाकडून शहरात रोजगारासाठी येणायांचा लोढां बघून संस्थेने सपोर्ट ग्राहक सेवा केंद्राच्या माध्यमातून शहरी गरिबी निर्मुलनाचा कार्यकम हाती घेतला यात प्रामूख्याने रोजगार व स्वंयरोजगार या विषयावर भर देण्यात येतो.

## ‘प्रेमांकूरची’ भूमिका...

या कामातून आमची सामाजिक प्रश्नांची आणि सर्वसामान्य लोकांच्या वास्तव समस्यांची जाणीव आणि समज अधिक विकसित होत गेली.विकास म्हणजे काय ? या मूलभूत प्रश्नाचे उतर शोधण्याचा आम्ही सातत्याने प्रयत्न केला. सर्व सामान्यतः भौतिक साधनसुविधा निर्माण करणे मोटमोठे प्रकल्प उभारणे यांचा विकास असे संबोधले जाते या विकासाच्या प्रारूपाने गंभीर परिणाम आपण आज अनुभवत आहोत. आपल्या समाजात एकीकडे अत्यंत संपन्न जीवन जगणारे मूठभर लोक आहेत तर ज्यांना मूलभूत गरजांच्या पुर्ततेसाठी दैनंदिन झगडावे लागते असा बहुसंख्य समाज आहे. विकासाच्या प्रचलित प्रारूपामध्ये या दोन जनसमूहातील दरी दिवसेंदिवस वाढते आहे. शहरी ग्रामीण गरीब जनसमूहांना शिक्षण आरोग्य उपजिविका अशा सुविधा मिळणे दुरापास्त होत चालले आहे.शिवाय त्यांच्या हाताशी असलेली साधनेही विकासाच्या नावाखाली ओरबडून घेतली जात आहेत. विकासाच्या बडेजावात लोकहित डावलले जाते आहे.

सर्व सामान्य लोकांना अधिकाधिक वंचित करणाया या प्रकियेला छेद द्यायचा तर लोककेंद्री कामाची गरज आहे असे आम्हाला वाटते. लोकांमध्ये जाऊन लोकांसोबत लोकाभिमूख कामातूनच ख-या अर्थाने लोकविकास होऊ शकतो यावर ‘प्रेमाकूरचा’ विश्वास आहे. या भूमिकेला अनुसरून संस्थेने गांव हे केंद्रवर्ती मानून गावातील बालके युवक महिला आणि शेतकरी या चार घटकांना सामावणारे अनेकवीध उपकम हाती घेत काम उभे केले. तसेच ही भूमिका रूजवत कामाची खोली आणि व्याप्ती वाढवली.

## ‘कार्यक्षेत्र’...

असमतोल स्वरूपाच्या आणि म्हणूनच विषमतेला खतपाणी घालणा-या विकासाचे जे परिणाम आज देशात ठिकठिकाणी दिसत आहेत त्याला पेठ व सूरगाणा हा आदिवासी तालूकाही अपवाद नाही. औदयोगिकरणापासून दूर व निसर्गात राहणारा आदिवासी...परंतू माणसांची भूक वाढली मोठया प्रमाणावर जंगल तोड झाली भरपूर पाऊस पडून ही त्याचा फायदा मात्र इतरांना. बारमाही शेतीसाठी वाव नाही त्यामूळे जिथे काम मिळेल आपला व आपल्या कूटंबांचा उदरनिर्वाह होऊ शकेल अशा शहराकडे धाव घेणे.यामूळे गाव ओस पडू लागली गावातील असणा-या सामाजिक आर्थिक परिस्थिती किंवा दैनंदिन सेवा सुविधांची स्थिती मात्र उपेक्षितच राहिली आहे.

शासनाच्या आदिवासी समाजासाठी असंख्य योजना व स्वतंत्र यंत्रणा परंतू हे फक्त कागदावरच तालुक्याच्या कित्येक गावांमध्ये या विकासाचे कोणतेच लाभ पोहचलेले दिसत नाहीत. कित्येक गावांना आजही टॅंकरनेच पाणी पुरवठा होतो. कूपोषणाचे माहेर घर म्हणून महाराष्ट्रात याच तालूक्यांचा समावेश होतो.पिण्यासाठी व शेतीसाठी असणा-या पाण्यासाठी असलेली नार पार योजना कित्येक वर्षापासून शासनदरबारी धूळखात बसली आहे.शिक्षणाच्या प्रश्नावर शासन मोठ मोठयाने बोलतांना दिसत परंतू गावात मूलांना बसायला शाळा नाही चार वर्गासाठी एकच शिक्षक तोही आला तर आला नाही तर मूलांना सूटीच...शासनाने प्रत्येक नागरिकाला गावातच काम मिळावे यासाठी संपूर्ण ग्रामिण रोजगार हमी योजना कायदा आणला परंतू ज्या नागरीकासाठी काम मिळायला हवे तो वंचितच राहिला व शासणाने मूठभर लोकांना हाताशी घेऊन ठेकेदाराकडून काम करून आम्ही लोकांना काम दिले व पैसा हडप केला.यासाठी संस्था पेठ तालूक्यात खिरकडे, तिर्डे, धोंडमाळ, वांगणी, कोपूर्ली, जोगमोडी तर सूरगाणा तालूक्यात रोंगाणा, मनखेड, हेमाडपाडा, जाहूले, आंबोडा, राक्षसभूवन, पळसन, मांगदे, बा-हे, हस्ते, कळमने, भोवडा या क्षेत्रात काम करते.

तर हाच माणूस शहरात येऊन झोपडपटीत किंवा रस्त्यावर करून राहणा-या नागरिकांचे प्रश्न थोडे वेगळे इथे काम आहे परंतू कामाच्या बदलात दाम नाही. आर्थिक सक्षम घटकातील लोक यांचा वापर वेवेगळया अनैतिक कामांसाठी करून स्वतः चा फायदा करून यांना वाटेवर सोडतात यातूनच जन्माला आली ती गूडगिरी अनैतिक व्यवसाय व मार्ग...

या दोन्ही घटकांच्या विकासाच्या कल्पना आणि अग्रकमही वेगळे आहेत. पाणी रोजगार या दैनंदिन प्रश्नांच्या सोडवणुकीबरोबरच शिक्षण व आरोग्य सेवांची निश्चिती आणि त्यांचा चांगला दर्जा किंवा सामूहिक जनजीवन निर्णयप्रक्रिया यांना प्राधान्य संसाधनांची जपवणूक आदि बाबींची जाणीव ठेऊन आणि सर्वकष स्वरूपाचा विकास ही खरी गावांची व वस्त्यांची गरज आहे. शिवाय स्थानिक नैसर्गिक संसाधने पुनरूज्जीवन करून शाश्वत स्वरूपाचे पर्याय उभे करणेही महत्वाचे आहे.

## ‘महत्वाचे उपक्रम’...

पेठ व सूरगाणा या आदिवासी तालूक्यातील १८ गावांमध्ये संस्थेचे प्रत्यक्ष उपक्रम चालू आहे. याशिवाय इतर गावांमध्येही जनजागृती व नैमितिक कार्यक्रम यातून संपर्क चालू आहे.तर शहरातील मध्य नाशिक मधील १० झोपडपटयांमध्ये रोजगार व स्वंयरोजगाराचे उपक्रम सूरू आहे. याच बरोवरीने महाराष्ट्र सामाजिक मंच, नाशिक एन.जी.ओ फोरम, अफार्म या नेटवर्कची समन्वय संस्था म्हणून सामाजिक उपक्रमात संस्थेचा सक्रिय सहभाग आहे.

## सखी प्रकल्प, ता.पेठ व सूरगाणा

### महिला सक्षमीकरण - स्वंयसहाय्यता बचत गट

**भूमिका** ः गावची निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रिया आणि त्यांचे प्रश्न हे कायम दुर्लक्षितच राहतात. सामाजिक उतरंडीमध्ये स्त्रियांना कायम डावलले गेल्याने स्त्रियांची मानसिकताही दवलेली राहते.घरात आणि घराबाहेर अश दोन्ही ठिकाणी कामात सहभागी असूनही स्त्रियांच्या कामाला उत्पादक कामाचा दर्जा नाही त्याचबरोबरीने कोणतेही निर्णय घेतात त्यांचे मत विचारले जात नाही. स्त्रियांमध्ये जाणीव जागृती करून त्यांच्या विचारकक्षा रूंदावत नेल्या तरच स्त्रिया आपली परिस्थिती बदलण्यासाठी सक्षम होत जातील. स्त्रियांसोबत कामामध्ये मुख्यतः बचत गट आणि पंचायत राज या दोन विषयांवर प्रमुख भर दिला आहे.

सूवर्ण जयंती ग्रामस्वराज्य योजना जिल्हा परिषद नाशिक यांच्या संयुक्त विदयमाने सूरगाणा व पेठ तालूक्यातील महिला व युवक स्वंयसहाय्यता बचत गटाची स्थापना संस्थेच्या माध्यमातून करण्यात आली.यात सुरगाणा तालूक्यात १०० व पेठ तालुक्यात ७५ स्वंय सहाय्यताबचत गटाची नव्याने बांधणी करण्यात आली.हे सर्व गट हे आर्थिक दूर्बल घटकातील (BPL) असून सदर बचत गटांचे राष्ट्रीयकृत बॅकेत संयुक्त बॅक खाते ऊघडण्यात आले आहेत

**पेठ तालूका**

| | |
|---|---|
| पंजाब नॅशनल बॅक | १२ |
| एस.बी.आय | २४ |
| एन.डी.सी. सी | २७ |
| बॅक ऑफ महाराष्ट्र | १५ |
| एकून | ७५ |

**सूरगाणा तालूका**

| | |
|---|---|
| एन.डी.सी. सी | ४५ |
| देना बॅक | ५५ |
| एकून | **१००** |

बचत गटांनी दरमहा १० रू ते २०० रू.पर्यंतची बचत नियमीत करण्यात येत आहे.वर्षाअखेरीस बचत गटांनी एकूण पेठ तालूक्यात ६१२० रू. प्रमाणे एकूण वर्षाला ७३४४० रू.ची बचत करण्यात आलेली आहे तर सूरगाणा तालूक्यात १७२३२० रू.ची बचत करण्यात आली. एकूणच पेठ व सूरगाणा तालूक्यात एकूण २४५७६० रूपयांची बचत गटांची करण्यात आली.

बचत गटांचे आर्थिक व्यवहार योग्य व व्यवस्थित असल्याने बॅंकेणे ५९ बचत गटांचे पहिले ग्रेडेशन करून गटांना खेळते भांडवल म्हणून सूरूवातीचे २५000 रूपयाची रक्कम देण्यात आले आहे. यातून गटांना कुठल्या प्रकारचा व्यवसाय उभा करायचा व यासाठीचे नियोजन व प्रशिक्षण कार्यक्रम संस्थेच्या अंतर्गत सूरू आहे.

संस्थेकडील २२ बचत गटांना शासनाच्या सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शालेय पोषण आहार शिजविण्याचा उपक्रम, स्वस्त धान्य रेशन दूकाण, रॉकेल विकि केंद्र ग्रामसभेव्दारे व त्यांच्या एकूणच पारदर्शकामामूळे मिळवून देण्यात आला आहे.

बचत गटातील अध्यक्ष व सचिव यांना संस्थेअंतर्गत नियमित वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते व इतर संस्था मध्येही प्रशिक्षणास पाठविण्यात येते. तर नऊ बचत गटातील सदस्यांना संपूर्ण स्वच्छता अभियाना अंतर्गत हागणदरी मूक्त गांव व आदर्श गांव बघण्यासाठी अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

**जाणिव जागृती शिबिर** ः केंद्रिय समाजकल्याण बोर्ड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रा.पं.घोडांबे व ग्रा.पं.बा-हे ता.सूरगाणा येथे सात दिवसाचे जाणीव जागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये स्वंयसहाय्यता महिला बचत गटाच्या महिला व युवकांना तज्ञ व प्रतिष्टीत व्यक्तींकडून खालील विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. यात माता व बाल आरोग्य ‘आपण आपले आरोग्य’ माहितीपट व कुपोषण व पाण्याची कमतरता, कुपोषित मुले व माता आरोग्य तपासणी, प्रसूती व त्याचे दुष्परीनाम, कौंटूबिक हिंसाचार व कायदा, वयात येतांना घ्यावयाची काळजी, वयात येतांना माहितीपट, हागणदरी गाव, संपूर्ण स्वच्छता अभियाना अंतर्गत हागणदरी मुक्त गाव संकल्पना, सोनपावल व स्वच्छतादूत माहितीपट यासारखे कार्यक्रम घेण्यात आले. शिबिराचे ऊदघाटन जि.प. सदस्य जनार्दन भोये यांच्या हस्ते करण्यात आले.

**पंचायत राज प्रशिक्षण** ः ग्रा.पं.बाहे व मनखेड ता.सूरगाणा येथील ग्रामपंचायत सदस्य गट व गणातील पंचायत समिती सदस्य जि.प.सदस्यांना पंचायतराजचे विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये ग्रामपंचायत पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्यांची भूमिका व जबाबदारी समजावण्यात आली गावातील गटाच्या व गणाच्या कुठल्या प्राथमिक व महत्वपूर्णसमस्या आहेत या समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावरून कुठल्या प्रकारातील योजना आहेत व कशा प्रकारचा निधी विकासकामासाठी ऊपलब्ध होऊ शकतो ग्रामसभा व ग्रामपंचायत सदस्य मासिक त्रैमासिक मिटींग किती महत्वाची आहे. यासाठी दोन दिवसाचे प्रशिक्षण ग्रा.पं.बा-हे ता. सूरगाणा येथे घेण्यात आले.





## महिला सम्यूपदेशन केंन्द्र...

राज्य महिला आयोगाांतगेत महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांच्या संयुक्त विदयमाने पेठ व सुरगाणा  येथे महिला सम्यपदेशन केंद्र सुरू करण्यात आले. या समुपदेशन केंद्राव्दारे महिलांना त्यात्त्व्या कौंटूबिक सामाजिक समस्या सोडविण्यासाठी मदत व कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात येते तसेच योग्य त्या प्रकरणांमध्ये समुपदेशनही आयोजित केले जाते.ऊदा. हुंडाबळी प्रकरण विभक्त कूटूंबाच्या समस्या घरगुती अत्याचार घरातून बाहेर काढण्याची धमकी देणे मारहाण करणे रात्री अपरात्री घरातून बाहेर काढणे घटस्फोटासाठी दबाव आणने घटस्फोट व पोटगी प्रकरण मालमता हक्क लैगिंक छळवणूक इ.मानसिकदृष्टया असंतूलीत महिलांचे सामाजिक मानसशास्त्रीय कायदेशिर समुपदेशनही यात केले जाते.या वर्षात संस्थेकडे पेठ तालूक्यासाठी १८९ व सूरगाणा तालूक्यात १४६ प्रकरणाची नोंद झाली सर्व प्रकरण हे कुठल्याही प्रकारची पोलीस केस न होता समूपदेशनातून सोडविली.

## संपर्क कार्यालय...

बचत गटातील सर्व महिलांना व युवकांना संपर्कासाठी सोयीचे व्हावे म्हणून पेठ तालूक्यात स्थानिक पेठ मध्ये व सूरगाणा तालूक्यात बा-हे येथे ‘प्रेमांकूर’ संपर्क कार्यालय उभारण्यात आले. याची माहीती इतर ही शासकीय व अशासकीय तसेच पदाधीकायांना व्हावी यासाठी या कार्यालयाचे ऊदघाटन जिल्हा परिषद सदस्य मनोज भोंगे पंचायत समिती सभापती मनोहर भोये गटविकास अधिकारी श्रीमती मीना जगताप सर्व खात्यांचे विस्तारअधिकारी आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्म चारी व ग्रामपंचायत सदस्य तसेच महिला स्वंयसहाय्यता बचत गटाच्या सर्व सदस्या यांच्या हस्ते करण्यात आले.









## शिक्षण...

विकासाचे आणि सक्षमतेचे बीज बाल्यावस्थेतच रूजवणे गरजेचे असते. या दृष्टीने लहान मुलांच्या विकासात शालेय शिक्षणाची महत्वाची भूमिका आहे. पण आज सर्वच मुले शाळेत प्रवेश घेतात असे नाही. कधी हलाखीची परिस्थितीमूळे मुले शालेय शिक्षणापासून वंचित राहतात. तर कधी पाठयक्रमांचा परिसराशी आणि वैयक्तिक जीवनाशी संबंध नसल्याने शिक्षण नीरस वाटून मुले अर्ध्योवरच शिक्षण सोडतात.

पेठ व सूरगाण्यातील परिस्थीती थोडी वेगळी यात रोजच्या जगण्याचे साधनच गावातच उपलब्ध नाही. पाऊसाळयापूरत गावात शेतीचे काम आटोपल्यावर पून्हा शहारात मजूरीच्या कामासाठी सहकूटूंब जायचे यात मूलांचा वापर आपल्याच लहाण भांवडांना सांभाळण्यासाठी होतो यामूळे मूलांना आपल्या बरोबरच घेऊन जायचे किंवा सर्वच मजूरीसाठी शहरात जाणार घरी मूलांना कोण सांभाळणार यासाठी मूलांना बरोबरच घेऊन जाणे व त्यांना ही कमी मजूरीच्या कामासाठी लावणे तर काही पालक आपल्या मूलांना आश्रमशाळेत शिक्षणासाठी पाठविणार एकूणच संस्थेच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये शिक्षण अर्धवट सोडणारी व मजूरीसाठी जाणा-या मूलांची संख्या मोठया प्रमाणावर आहे.

जी मूले शाळेत जातात त्यांचीही शैक्षणिक भूक ख-या अर्थाने भागली जाते असे नाही. शासनाने शिक्षण प्रक्रिया एक चाकोरीत बंदिस्त केली आहे ज्यात मुलांच्या निखळ क्षमताविकासापेक्षा परीषा स्पर्धा यातून यशापयशाचे मापदंड ठरले जातात. शाळेत जाणा-या व न जाऊ शकणा-या सर्व बालकांचा विचार करता त्यांच्यासाठी औपचारीक शिक्षणाबरोबरच शिकणाच्या अनौपचारिक संधी आणि जागा निर्माण करणे आम्हाला आवश्यक वाटते व त्यासाठी आम्ही सुरूवात केली.

## खेळघर...

हा उपक्रम गावातील खळवाडीशी मिळताजूळता असा आहे. सायंकाळी मुलांनी एकत्र यावे मुक्तपणे खेळावे आणि मोकळेपणे अभिव्यक्त व्हावे असे ठिकाण म्हणजे खेळघर. खेळघरात गावातील शाळेत जाणारी व न जाणारी लहान मुले व मुली प्रत्येकी दोन तास याप्रमाणे एकत्र जमतात. त्यामूळे या दोहोंचा एकमेकांत संवाद होतो. खेंळाबरोबरच मुलांच्या सृजनशिलतेला पूरक असे चित्रकला मातीकाम हस्तकला असे कलात्मक उपक्रम आणि मुलांच्या संवाद भाषाविकासाला गती देणारे गाणी गोष्टी गप्पा असे उपक्रम येतात. गावातील जरा मोठया वयाची मुले व मुली यांची खेळघर म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रत्यक्ष काम प्रशिक्षण आणि कौशल्याची जोड यांमूळे खेळघर साथींच्या व्यक्तिमत्व व नेतृत्व विकासालाही या कामातून चालना मिळते.

## भितीपत्रिका...

वर्तमानपत्रातील बातम्या हा मुलांच्या चर्चेचा आवडीचा विषय. यातूनच कल्पना निघाली की आपणही आपल्या गावाचे वार्तापत्र काढायचे बातमीदार व्हायचे. मुलांनी लिहिलेल्या संपादित केलेल्या बातम्या गाणी गोष्टी याआधारे प्रत्येक गावात एक हस्तलिखित भितीपत्र तयार करण्यात आले. हा प्राथमिक प्रयत्न एका गावात मूलांसोबत केला यातून आमच्या लक्षात आले की शिक्षणाला आणि विचारप्रक्रियेला वाव देणारे आणि जाणीवा समृध्द करणारे प्रभावी माध्यम ठरले आहे.

## गंमत जत्रा...

खेळघर व भितीपत्राच्या उपकमातून मुलांनी जे अनुभव ज्ञान कमावले जो विश्वास संपादित केला त्याचे आदान प्रदान करण्यासाठी म्हणून एका वर्षात एका गमत जत्रेचे आयोजन करण्यात येते. मुलांच्या दृष्टीने आपल्या बालपणाचा आनंद मुक्तपणे उपभोगण्याचा गंमत खोडया आणि मस्ती करून अभिव्यक्त होण्याचा दिवस म्हणजे गंमत जत्रा.



## ‘प्रेमांकूर’ ग्रामविकास सार्वजनिक वाचनालय...

संस्थेच्या माध्यमातून कार्यक्षेत्रातील युवकांच्या सहाय्याने प्रेमांकूर ग्रामविकास सार्वजनिक वाचनालयाची नोंदणीकृत निर्मिती केली. आजच्या माहिती युगात ग्रामिण भागातील युवकांना जगात चालणा-या घडामोडींची माहीती व्हावी व वाचनाची आवड निर्माण व्हावी व आपणही आपल्या भागातील विकास किंवा पूढे जाण्याचा मार्ग मिळावा. आज वाचनालयात विवीध प्रकारची सामाजिक, धार्मिक, स्पर्धा परिषांची पूस्तके, लहाण मूलांच्या गोष्टी, कथा व कांदब-या असे ४०० हून अधिक पूस्तके आहेत १४८ सभासद झाले आहेत. वाचनालयात स्थानिक वृतपत्रे मासिक वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आली.



# स्वंयरोजगार...

## भूमिका ः

ग्रामीण भागात शेती आणि शेतीपूरक उद्योग हे उपजिविकेचे प्रमूख स्त्रोत आहेत. शेतकयांकडे शेतीविषयी पारंपारिक आणि समृध्द ज्ञानभांडार आहे. परंतू कधी लहरी निसर्गामुळे तर कधी बाजार व्यवस्थेचे आकलन न झाल्याने शेतकयांचा कर्जबाजारीपणा वाढतो आहे. शेतकरी आत्महत्येस प्रवृत होत आहेत. शेती परवडत नाही म्हणून वैफल्यग्रस्त झालेले तरूण घरची जमीन ओसाड टाकून नोकरी मिळावी म्हणून धडपड करत आहेत. तर शहराकडे धाव घेऊन मजूरीचे काम करतात. या युवकाच्या उर्जेला सकारात्मक दिशा देऊन स्थानिक उपजिविकेच्या संधी निर्माण केल्या पाहिजेत व स्थंलातर थांबले पाहिजे अशी संस्थेची भूमिका आहे आणि त्यादृष्टिने पुढील ठोस कार्यक्रमही हाती घेतले आहेत.

## 'प्रेमांकूर' कार्यालयीन साहीत्य विकि केंद्र...

कार्यालयीन साहीत्य विकि केंद्रात शासनासाठी लागणारे सर्व प्रकारचे अर्ज यात माहीतीच्या अधिकाराचे अर्ज, उत्पनाचा दाखला, रहिवासी दाखले, महिला बचत गटाचे दप्तर व गटातील वैयक्तिक पासबूक, रजिस्टर, पेन, बॅकेचे निलचे दाखले, व इतर स्टेशनरी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या केंद्रातून विकि बरोबरच आलेल्या प्रत्येकाला विवीध प्रकारचे फॉर्मस कुठे व कसे भरावयाचे यावाबत मार्गदर्शन केले जाते.

## ग्रामिण रोजगार हमी योजना...

गावसंपर्कातून संस्थेच्या लक्षात आले की प्रत्येक गावात रोजगाराची गरज असलेल्या लोकांची संख्या बरीच मोठी आहे. किमान सहा महिने कामाची गरज असणाया या लोकांना गावातच रोजगार निर्माण करणे गरजेचे आहे. केंद्रशासनाच्या ग्रामीण रोजगार हमी कार्यकमाचा लाभ या लोकांना मिळवून देण्याचा विचार संस्थेने केला. या सरकारी योजनेबद्यल ग्रामपंचायत सदस्य बचतगट संघटिका युवक मंडळ अशा नेतृत्वक्षम लोकांना प्रशिक्षण नाशिक येथील प्रगति अभियाना अंतर्गत अश्विनी कूलकर्णी यांनी दिले. या अंतर्गत स्थानिक पातळीवर आवश्यक ते काम सुरू करण्यासाठी लोकांनी पाठिंबाही मोठया प्रमाणावर दिला.

## खादी ग्रामोद्योग मंडळाअंतर्गत ग्रामीण रोजगार निर्मिती...

खादी ग्रामोद्योगाच्या कार्यकमांव्दारे राज्यातील बेरोजगार युवकांना ग्रामीण भागातच स्थानिक साधन संपतीचा वापर करून जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देता याव्यात यासाठी केंद्र शासनाने खादी ग्रामोउद्योग आयोगोच्या माध्यमातून स्थानिक वितीय संस्थाच्या सहकार्याने प्रशिक्षण व आर्थिक मदत देण्याचे ठरविले या प्रशिक्षणासाठी स्थानिक युवकांना पाठविण्यात आले व पूढे या केंद्रातून मोठया प्रमाणावर युवक व महिला बचत गटाच्या महिला सहभागी होतील असे चित्र निर्माण झाले. सध्या घाण्याचे तेल मसाला ऊद्योग व बेकरी उद्योगा साठी युवक प्रशिक्षण घेत आहे.

## इलेट्रिक दूरूस्ती प्रशिक्षण कार्यक्रम ः

जिल्हा किडा व युवक संचालन यांच्या संयुक्त विदयमाने सूरगाणा तालूक्यातील युवकांसाठी एक महिण्याचा प्राथमिक इलेट्रिक दूरूस्ती प्रशिक्षण कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते यात २५ युवकांनी सहभाग घेतला होता. या मागील संस्थेची भूमिका स्थानिक युवकांना आपल्या घरातील किंवा शेतीतील इलेट्रिक उपकरणांची माहीती होऊन ती सोडविता आली पाहिजे यासाठी शहरात यायची गरज न पडता पैशाचाही अपव्यय टाळता येऊ शकतो. यातूनच पूढे छोटा व्यवसाय उभाही करता आला पाहिजे.




**स्ट्रीट किड इंटरनॅशनल व साथी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या स्वंयरोजगार प्रशिक्षणातून उभे राहीलेले शहरी व ग्रामिण भागातील स्वंय रोजगार...**

### निसर्ग उद्यान...

जैवविविधता संवर्धनासाठी आपल्या परिसरातील नैसर्गिक संसाधनांची ओळख होणे गरजेचे आहे. कित्येक नैसर्गिक संसाधणे संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत. त्यांच्या संवर्धनासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न व्हावेत यासाठी 'प्रेमांकूर' संस्थेस ग्रामपंचायत मनखेड यांनी एक एकर जागा संस्थेच्या नावे केली आहे. या जागेत जैवविविधता साधन केंद्र हे सूरगाणा व पेठ तालुक्याचा संसाधन संपन्नतेची ओळख करून देणारे संग्राहालय बनविण्याचा संस्थेचा मानस आहे.

# उपजिविका

**भूमिका** ः ग्रामिण आदिवासी भागात शेती आणि शेतीपूरक उद्योग हे इपजिविकेचे प्रमुख स्त्रोत आहेत. शेतक-यांकडे शेतीविषयी पारंपारिक आणि समृध्द ज्ञानभांडार आहे. परंतु कधी लहरी निसर्गामूळे तर कधी बाजार व्यवस्थेचे आकलन न झाल्याने शेतक-यांचा कर्जबाजारीपणा वाढतो आहे. शेतकरी आत्महतेस प्रवृत होत आहेत. शेती परवडत नाही म्हणून वैफल्यग्रस्त झालेले तरूण घरची जमीण ओसाड टाकून नोकरी मिळावी म्हणून धडपड करीत आहे. युवकांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देऊन स्थानिक उपजिविकेच्या संधी निर्माण केल्या पाहिजेत अशी संस्थेची भूमिका आहे आणि त्या दृष्टिने पुढील ठोस कार्यकमही हाती घेतले आहेत.

**घाणा तेल** ः घाण्याच्या तेलाचा व्यवसाय हा शेतीपूरक असून शेतातून निघणारे भूईमूंग, खूरसाणी या बियांन्याचे विकि करून हातात नफा कमी येतो. परंतू याचेच तेल तयार करूण बाजारात विकिस अथवा स्थानिकांना तेल तयार करून दिल्यास याचा नक्किच फायदा होतो तसेच यातून निघणारी अन्य घटक जसे ढेप ही चांगल्या दर्जेचे पशूखादय म्हणून याची विकि अथवा घरातील जनावरांना दिल्यास जनावरास दूध चांगल्या प्रकारे मिळते हा दूहेरी फायदा लोकांना पटल्याणे शेतक-याच्या मनात असणारी नकारात्मक मानसिकता बदलण्यासाठी 'प्रेमांकूरणे' स्वतः या व्यवसायाची धुरा पेलण्याचे ठरवले. संस्थेच्या कार्यकर्त्यांने व गावातील युवकांने खादी ग्रामऊद्योग नाशिक येथे दोन महिण्याचे प्रशिक्षण घेऊन त्यामधील बारकावे समजावून घेतले व स्थानिक ठिकाणी रोजगार सूरू केला. आज संस्थेअंतर्गत शेंगदाणा, खूरसाणी, बदाम, खोबरे, जवस, तिळासारखे तेल बाजारात विकिस आणले शहरातील लोकांनी याची मोठया प्रमाणावर मागणी केली.

**रोजगार हमी योजना** ः गावसंपर्कातून संस्थेच्या लक्षात आले की प्रत्येक गावात रोजगाराची गरज असलेल्या लोकांची संख्या बरीच मोठी आहे. किमान सहा महिणे कामाची गरज असणा-या या लोकांना गावातच रोजगार निर्माण करणे गरजेचे आहे. केंद्रशासनाच्या ग्रामीण रोजगार हमी कार्यकमाचा लाभ या लोकांना मिळवून देण्याचा विचार संस्थेने केला. या सरकारी योजनेबद्यल ग्रामपंचायत सदस्य, बचत गट संघटीका, युवक मंडळ अशा नेतृत्वक्षम लोकांना प्रगती अभियाना अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले व काम मिळवण्याची कार्यपध्दती समजाऊन देण्यात आली. आणि गावात रोजगार हमी अंतर्गत स्थानिक पातळीवर आवश्यक ते काम सूरू करण्यासाठी पाठिंबाही देण्यात येत आहे.








## आरोग्य ः

आदिवासी ग्रामिण बालके आणि स्त्रिया यांच्या आरोग्यविषयक गरजा दुर्लक्षित राहतात. त्यामूळे बालकांमध्ये कुपोषणाचे मोठे प्रमाण असल्याचे दिसून येते. तर किशोरवयीन मुली आणि स्त्रिया यांच्यामध्ये कुपोषण व रक्तपांढरीचे प्रमाण जास्त आहे. या आरोग्यविषयक समस्यांची जाणीव करूण होऊन स्वतःच्या आरोग्याविषयी शरीराविषयी अधिक सहग बनणे आवश्यक आहे. आरोग्याचा प्रश्न सामाजिक दृष्टया पुढे आणून त्यावर मात करण्याची तोडगा करण्याची लोकांची भूमिका तयार करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.

### कूपोषण निर्मूलन...

सरकारी आकडेवारीच्या जुगलबंदीत न अडकता या गंभीर प्रश्नासाठी तातडीने ठोस कृती करण्याची गरज आहे. तसेच बालकांच्या कुपोषणाची सामाजिक आर्थिक अशी सर्व कारणे लक्षात घेऊन ही कृती करणे गरजेचे आहे. 'प्रेमांकूरने' संस्थेच्या कार्यक्षेत्रातील असलेल्या गावांमधील कूपोषित बालकांची माहीती घेऊन त्यांना शासनाच्या माध्यमातून मिळणारा मातेचा आहार व औषधे त्यांना वेळेवर कशा प्रकारे मिळतील अशी परिस्थीती महिला व युवक बचत गटाच्या माध्यमातून निर्मान केली. या संदर्भातील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामिण रूग्णालय यावरील सत्यस्थिती थंडरवेल प्राडक्शनच्या सहाय्याने फिल्म तयार करून तेथील समस्या शासनाच्या दरबारी मांडल्यात व काही दिवसातच सर्व सूविधा मिळायला लागल्यात यात युवक मंडळाचे योगदान महत्वाचे होते.

### किशोरी मूलींचे आरोग्य...

किशोरी मूलींचे आरोग्य आणि त्यांचे व्यक्तीमत्व या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू. या विषयावर मुलींचे शिबिर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील एका गावात प्रायोगिक तत्वावर घेण्यात आली यात मूलींना त्यांना शरीराची ओळख स्व जाणीव या विषयांशी परिचित केले गेले यातून मूली सूरूवातीला बोलायला घाबरायच्या परंतू आता मोकळया व नघाबरता बोलतात व इतरही मूलींना समजावून सांगतात. याशिवाय गावपातळीवर बैठका चर्चा यातूनही संवाद चालू असतो. यापूढील काळात गावपातळीवर किशोरी वयीन मूलींचे गट तयार करणे व त्यांच्या माध्यमातून आरोग्याची जाणीव जागृती करण्याचे ठरले आहे.

### महिला आरोग्य...

संस्थेने सुरू केलेल्या बचत गटांच्या मासिक बैठकांतून तसेच विशेष आयोजित बैठकांतून आरोग्यविषयक विविध माहिती महिलांपर्यंत पोहोचवली जाते. पोषक आहार शुध्द पाणी स्वच्छता कुपोषण याच बरोबरीने महीलांना लग्नाअगोदर व लग्नानंतर घ्यावयाची काळजी मासिक पाळी समज व गैरसमज आदी विषयांवरील सविस्तर माहिती महिलांना समजाऊन सांगितले जाते.

## एच. आय.व्ही. एडस पथनाटय व फिल्म शो ः

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील युवकांना एच. आय.व्ही एडस या विषयासंदभोत माहीती व्हावी व या रोगाला प्रतिबंधासाठी आपण नागरिक म्हणून काय काळजी घ्यावी यासाठी ग्रामपंचायत बाहे व मनखेड ता.सूरगाणा येथे एच.आय.व्ही एड्स संदर्भात माहिती चित्रपट दाखविण्यात आला ग्रामस्थांबरोबर चर्चा व त्यांच्या प्रश्नांचे निरसन केले व त्याबरोबर मराठीतील माहिती पूस्तीका सर्वांना वाटण्यात आल्यात.याच बरोबर युवकांनी समाजाचा आपणही एक भाग लागतो या नात्याने गावात आठवडे बाजारात पथनाटयाचे सादरीकरण केले.या वेळीस गावातील तसेच आजूबाजूच्या खेडयातील नागरिक उपस्थित होते.

**नेत्ररोग तपासणी** ः तूलसी आय हॉस्पीटल नाशिक यांच्या संयुक्त विदयमाने बा-हे येथे रविवारच्या आठवडा बाजाराचे औचित्य साधून नेत्ररोग तपासणी शिवीराचे आयोजन करण्यात आले होते. यात परिसरातील २४० रूग्णांची तपासणी करण्यात आली व यातून २८ महिला व पूरूषांचे मोतिबिंदूवर शस्त्रकिया करण्यात आली.

**लाईट मिटर जोडो अभियान** ः सूरगाणा तालूक्यात अधिकाधीक गावांमध्ये लाईट चोरून आकडा टाकून घेतले जाते. परंतू संस्थेच्या विवीध कार्यकमातून जनजागृती करून हे योग्य नाही व यातूनच आकडा टाकतांना दगावण्याची शक्यता आहे व इलेट्रिक खात्यातील अधिकायांच्या निदर्शनास आले तर दंड किंवा शिक्षा होऊ शकते. लोकांना हे पटले व इलेट्रिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने मनखेड येथे लाईट मिटर जोडो अभियान राबविण्यात आले. व १२५ लोकांनी संस्थेकडे अर्ज सादर केले व त्यांना तात्काळ लाईट मिटर देण्यात आले.

**माहितीचा अधिकार अभियान** ः माहितीचा अधिकार संदर्भात सोस्वा पूणे व प्रगती अभियान यांच्या वतीने संस्थेच्या कार्यकर्त्योना व गावातील युवकांना प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षणातून पूढे गावांमधून युवकांना महिला बचत गटांना ग्रामपंचायत सदस्यांना माहितीचा अधिकार हा आपला हक्क यावर चळवळच उभी राहीली.यातून दोन भ्रष्टाचाराच्या घटना ग्रामस्थांसमोर आल्यात यामूळे हा अधिकार लोकांना महत्वाचा वाटू लागला.





# शहरी गरिबी निर्मुलन...
## सपोर्ट ग्राहक सेवा केंद्र...

सपोर्ट, ग्राहक सेवा केंदांतर्फे दुर्बल व दुर्लक्षित घटकातील लोकांना रोजगाराची संधी ऊपलब्ध व्हावी या उद्येशाने नाशिक शहरात कामास सुरूवात  केली असून हया प्रकल्पादवारे दैनंदिन गरजेच्या कामांची घरपोच सेवा ऊपलब्ध करून देण्यात येत आहे. यामध्ये प्लंबर, सुतार, इलेट्रिकल, इलेट्रॉनिक्स, घरकाम करण्यासाठी महिला, हाऊसकिपींग, गॅस गिझर रिपेरिंग, मुलांना सांभाळणे, पाण्याची टाकी साफ करणे, स्वंयपाक करणे, केटरिंग, ड्रॉयव्हर व इतर घरगुती मदत व सेवा ग्राहक सेवा केंद्रा अंतर्गत पुरविण्यात येतात आज पोवोत संस्थेअंतर्गत ५00 सभासद करण्यात आले आहेत व ४0 युवकांना रोजगार ऊपलब्ध करून देण्यात आला आहे.







### महिला स्वंयसिदधा प्रकल्प...

महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी स्वंयसिदधा प्रकल्पाचे ऊदघाटन पंचवटी प्रभागाच्या सभापती सौ. कविता कर्डक,नाशिक महानगरपालीका सूवर्ण जयंती रोजगार योजनेचे विभागीय ऊपआयुक्त अरूण सोनार सौ. सीमा कोकाटे डॉ. सौ. अनुपमा डहाळे यांच्या हस्ते करण्यात आले.

स्वंयसिद्वधा प्रकल्पादवारे महिलांना घरातील काम करून विवीध व्यवसाय करता येतील यामध्ये गुलाबांच्या फुलांचे बुके , भाजी कटींग, सॅनिटेशन पॅड, इडलीचे पीठ, लॉन्ड्री, घाण्याचे तेल व इतर विवीध ऊपक्रम प्रकल्पाव्दारे हाती घेण्यात आले आहे. प्रामुख्याने नाशिक शहरातील लोकांची गरज बघून ज्या व्यवसायाला मागणी असेल असे ऊद्योग ऊभे करणे विवीध प्रशिक्षण देणे व त्या दवारे महिलांचा सर्वांगिन विकास करणे हा प्रमुख ऊद्येश स्वंयसिद्वा प्रकल्पाचा आहे.

## घरपोच भाजीपाला...

जागतिक महिला दिनाच्या निमीत्ताने संस्थेअंतर्गत शासकीय वात्सल्य वसतिगृह मदर होम यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या सर्वांगिन विकासासाठी सपोर्ट स्वंयसिद्धा प्रकल्पा अंतर्गत **"घरपोच भाजीपाला"** या प्रकल्पाचे ऊदघाटन श्रीमती. सरीता नरके पाटील ऊपजिल्हाधीकारी यांच्या हस्ते करण्यात आले. महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी नाशिक शहरात प्रकल्पाव्दारे दूर्बल व दूर्लक्षित घटकातील महिलांना रोजगार मिळावा हा प्रमुख ऊद्देश आहे. घरपोच भाजीपाला हि संकल्पना प्रामुख्याने ग्राहकाला बाजारातून भाजीपाला आनणे व हयासाठी होणारा त्रास, भाजीचे वजन योग्य नसणे भाजीपाला ताजा व दर्जेदार हयाचा अभाव बाजारभावाचे ज्ञान नसणे हयामुळे ग्राहकाची मोठया प्रमाणात फसवणूक होते. घरपोच भाजीपाला हया प्रकल्पाअंतर्गत दर्जेदार व स्वच्छ निवडलेला ताजा बाजारभावापेक्षा कमी अथवा वाजवी भाव व तात्काळ सेवा ग्राहकाभिमूख व ग्राहक केंद्रित अशी सेवा नाशिक मध्ये सुरू करण्यात आली आहे. सदर सेवेद्वारे शेतकर्यांकडून माल खरेदी करून तात्काळ त्यावर प्रकिया करून त्याच दिवशी ग्राहकापर्यंत दर्जेदार व ताजा माल पोहचविणे हे प्रमुख कार्य या प्रकल्पाचे आहे. या प्रकल्पाद्वारे वसतिगृहातील महिलांना व मुलींना वसतिगृहातच राहवून आर्थिक सहाय्य मिळावे हाही या प्रकल्पाचा ऊद्देश आहे.



**महीला स्वंयसिध्दा प्रकल्पा अंतर्गत वस्तीत असणा-या १० वी १२ वीच्या गुणवंत विदयार्थ्यांचा सत्कार करतांना पालक व विदयार्थी...प्रमूख पाहूणे मा. अजय बोरस्ते उपमहापौर मनपा नाशिक...**



**सपोर्ट, ग्राहक सेवा केंद्रा अंतर्गत घरपोच भाजीपााला प्रकल्पाचे उदघाटन करतांना उपजिल्हाधिकारी संगिता नरके...**

# नेटवर्कींग...

**भूमिका** ः सामाजिक परिवर्तनाचे काम प्रभावी करायचे असेल तर समविचारी संस्थांनी परस्पंरांशी समन्वय राखला पाहिजे. नेटवर्कींग व यास्वरूपाच्या सामूहिक कामातून विचार व अनुभवंचे आदान प्रदान होते व त्यामूळे आपला दृष्टीकोन विकसित होतो. तसेच सामूहिक कामातून कामाची व्याप्ती आणि प्रभावही वाढतो. म्हणूनच 'प्रेमांकूर' विविध नेटवर्कमध्ये सहभागी आहे.

**नाशिक एन.जी.ओ.फोरम** ः हे नाशिक जिल्हयातील स्वंयसेवी संस्थांचे व्यासपीठ आहे.पन्नासहून अधिक संस्था फोरमच्या सदस्या असून संस्था पातळीवर येणाया अडचणी व आप आपल्या कामाचे आदान प्रदाण करणे व आपला दबाव गट निर्माण करणे.

**अफार्म, पुणे** ः ग्रामिण भागात काम करणाया संस्थांचे महाराष्ट्र भराचे हे कार्यजाळे असून यात ग्रामिण भागातिल संस्थांना व प्रामूख्याने कार्यकर्त्योना वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण या मार्फत मिळत असते.

**महाराष्ट्र सामाजिक मंच** ः महाराष्ट्र सामाजिक मंच ही एक अशी प्रकिया आहे जेथे सहभागी संस्था आणि चळवळींना प्रोत्साहन देऊन त्यांच्या स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीवर या संस्थांना सहभागी होऊन यातून नवीन दृढ असणारे महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र पातळीवर महत्वाची भूमिका बजावत आहे.

**पत्रकार मंच** ः माध्यमे ही लोकप्रबोधणाची महत्वाची भूमिका निभावू शकतात म्हणून त्यांना सामाजिक बदलाच्या प्रकियशी जोडून घेणे आवश्यक आहे. पेठ व सूरगाणा तालुक्यातील सामाजिक प्रश्न शासकीय योजना मानवी अधिकार अशा महत्वपूर्ण विषयांवर पत्रकारांसोबत आदान प्रदाण करण्यासाठी संस्थेतर्फे पत्रकारांना वेळोवेळी भेटणे सत्यता समोर आणने व या प्रश्नाला शासनासमोर व लोकांपर्यंत पोहचविणे.







# प्रकाशने...

## भूमिका ः

आपले काम अनुभव आणि विचार इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुस्तके वार्तापत्रे ही माध्यमे उपयुक्त ठरतात. विविध उपक्रम घेत असतांना आपले शिक्षण होत असते. नव्या मुदयांचे आकलन होत असते आणि बाबी नोंदवून ठेवणेही गरचेचे असते. म्हणजेच आपल्या कामाची प्रकिया नोंद दस्तऐवजीकरण करण्यासाठी आणि आपला अनुभव लोकांसोबत वाटून घेण्यासाी लेखन प्रकाशने हे माध्यम महत्वाचे आहे.


## सहभागी गाव अभ्यास व नियोजन (PRA)...

आपण गावात राहतो परंतू आपल्याला आपलच गांव परिपूर्ण माहीती नसत आपल्या गावच्या समस्या शोधता येत नाही यासाठीी लोकसहभागातून आपल्या गावचा नकाशा करून गावच्या समस्या लोकसहभागातून व शासनाच्या मदतीने किंवा वैयक्तिक पातळीवर कसे सोडविता येतील यासाठी ही पूस्तीका बनविण्यात आली आहे.

## गवंडी मार्गदर्शक पूस्तीका...

संपूर्ण स्वच्छते अंतर्गत हांगणदरी मूक्त गाव ही संकल्पना व यात गवंडयाची भूमिका महत्वाची असते यासाठी सामाजिक गवंडी कसा तयार होइल व लोकसहभागातून कमी किमतीचा व दर्जेदार शौचालय कसा निर्माण होईल यासाठी ही पूस्तीका तयार करण्यात आली या नवनवीन गवंडी किंवा युवकांनी या पूस्तीकेचा वापर करून चांगले शौचालय बांधू शकता.



# दखल...

आय.बी.एन. लोकमत या वृतवाहीनीने नाशिक शहरात एक आगळा वेगळा उपक्रम म्हणून सपोर्ट ग्राहक सेवा केंद्राची दखल घेतली व सदरचा प्रकल्प पूर्ण महाराष्ट्रत पोहचविला.



## ‘प्रेमांकूरचे सहकारी’...

**प्रेमांकूरचे कार्यकर्ते ः**

- भास्कर ब्राम्हणे
- शांताराम बोळावकर
- भारती ब्राम्हणे
- वामन जाधव
- शोभा जाधव
- पंडीत भोये
- हरिष गांगोडे
- अशोक महाले
- शांताराम गुंबाडे
- मनिषा मूर्तडक
- वैशाली पगारे
- अर्चना पवार

**कार्यकारी मंडळ ः**

| | |
|---|---|
| मंगेश लक्ष्मण सूर्यवंशी - | अध्यक्ष |
| गंगाधर सखाराम जोशी - | उपाध्यक्ष |
| महादेवी देविदास बारसकर - | सचिव |
| श्यामकांत दामोदर पाटील - | सहसचिव |
| योगेश सुभाष सुर्यवंशी - | कोषाध्यक्ष |
| अलका शिवाजीराव देसाई - | सदस्य |
| डॉ. रोहीणी किरण पाटोळे - | सदस्य |

**कार्यक्षेत्र** ः जिल्हा नाशिक तालूका पेठ व सूरगाणा

| पेठ | सूरगाणा | |
|---|---|---|
| १. खिरकडे | १. रोंगाणा | ७. पळसन |
| २. तिर्ढे | २. मनखेड | ८. मांगदे |
| ३. धोंडमाळ | ३. हेमाडपाडा | ९. भोवडा |
| ४. वांगणी | ४. जाहूले | १0. बाहे |
| ५. कोपूर्ली | ५. आंबोडा | ११. हस्ते |
| ६. जोगमोडी | ६. राक्षसभूवन | १२. कळमने |

**नाशिक शहर...**

मल्हारखान, कस्तूरबानगर,संतकबीर,सिध्दार्थ,मिलींदनगर,संतआंद्रिया, जोशीवाडा....

## निधी साहाय्य आणि सहयोगी संस्था...

## संस्था मित्र...

| | |
|---|---|
| • प्रेरणा मुंबई | प्रविण व प्रिती पाटकर |
| • महाराष्ट्र सामाजिक मंच | प्रमोद झिंजाडे |
| • अभिव्यक्ती मीडीया फॉर डेव्हलपमेंट | सूजाता बावर |
| • नाशिक एन.जी.ओ फोरम | मूक्तेश्वर मूनशेटीवार |
| • साथी मुंबई / स्ट्रीट किड इंटरनॅशनल | मन्सूर कादि्र |
| • सोस्वा ट्रेनिंग ॲण्ड प्रमोशन इन्स्टिटयूट, पुणे | परिणीता कानिटकर |
| • अफार्म पुणे | सूभाष तांबोळी |
| • अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे | मेधा जोशी |
| • बागलाण सेवा समिती | राजू शिरसाठ |
| • संघर्ष सेवा समिती | विष्णू शेवाळे |
| • नाबार्ड | अंनत म्हसकर |
| • मराठवाडा ग्रामिण विकास औरंगाबाद | आप्पासाहेब उगले |
| • टीचींग लर्निग सेंटर | शुभदा देसाई / निलेश साळगावकर |
| • वात्सल्य  महिला वस्तीगृह | नलिनी पाटील |
| • नवम पूणे | डॉ.निर्मल पंडीत |
| • अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे | मेधा जोशी |

## निधी सहाय्य...

- जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा (DRDA) जि.प.नाशिक
- सर्व शिक्षा अभियान, जि.प.नाशिक
- ग्रामिण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जि.प.नाशिक
- महिला व बाल कल्यान विभाग, जि.प.नाशिक
- जिल्हा किडा व युवा संचालन, नाशिक
- महाराष्ट्र समाज कल्यान वोर्ड, मुंबई
- महात्मा फूले समाज सेवा मंडळ, करमाळा
- ग्रामपंचायत मनखेड व बा-हेता.सूरगाणा जि.नाशिक

**यांच्या सहयोगाशिवाय 'प्रेमांकूरची' वाटचाल अशक्यच.धन्यवाद... !**